# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल :approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/९५४३

दिनांक : २८-०६-२०१५

मा. सचिव/मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व मानताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर, नाशिक)

विषय : शिक्षक मान्यता प्रस्ताव सादर करताना भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) यांचे समकक्षता असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) संलग्नित महाविद्यालय/मान्यता प्राप्त संस्थेतील शिक्षकांची नियुक्ती करीत असताना त्यांची शैक्षणिक अर्हता पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी. पदवी परदेशात प्राप्त केलेली असेल त्यांनी रूजू होतेवेळेस भारतीय विश्वविद्यालय संघाचे (AIU) समकक्षता असल्याचे प्रमाणपत्र महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे व महाविद्यालयाने त्यांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव या विभागात पाठविताना सदर प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या शिक्षकांनी परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पीएच. डी. पदवी प्राप्त केलेली असेल व त्यांनी भारतीय विश्वविद्यालय संघाचे (AIU) समकक्षता असल्याचे प्रमाणपत्र न जोडताच शिक्षक मान्यता घेतली असेल अशा महाविद्यालयातील शिक्षकांनी महाविद्यालयामार्फत भारतीय विश्वविद्यालय संघाचे (AIU) समकक्षता असल्याचे प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत या विभागास सादर करावे.

३) कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी जे शिक्षक भारतीय विश्वविद्यालय संघाचे (AIU) समकक्षता असल्याचे प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत सादर करू शकणार नाहीत अशा शिक्षकांची शिक्षक मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी व मान्यताप्राप्त संस्थानी उपरोक्त बाबींची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला

उपकुलसचिव २८/६/१५
(शैक्षणिक विभाग)